# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**५९) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि२३.०९.२०२२**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (१६/०९/२०२२ ते २२/०९/२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२४/०९/२०२२ ते २८/०९/२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | दिनांक | २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| ०.० | ४.६ | ३६.० | ४१.८ | ३३.८ | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | २० | ६ | ४ | १५ | १० |
| २९.० | २९.० | ३१.५ | ३१.० | २६.५ | ३१.५ | ३१.५ | कमाल तापमान (अं.से.) | २७ | ३० | ३१ | ३२ | ३२ |
| २०.७ | १९.४ | १८.७ | १९.२ | १९.२ | २१.२ | १९.७ | किमान तापमान (अंसे.) | २२ | २३ | २४ | २४ | २४ |
| २.० | २.० | २.० | २.० | २.० | २.० | २.० | ढग स्थिती (आकाश) | ८ | ५ | ४ | ६ | ४ |
| ९२.० | ९६.० | ९५.० | ९८.० | ९५.० | ८७.० | ८८.० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (% | ८६ | ९० | ८८ | ८७ | ८९ |
| | ६१.० | ६५.० | ७१.० | | ५५.० | ५०.० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६५ | ६७ | ५८ | ६० | ५८ |
| ४.२ | ४.० | १.५ | २.४ | २.४ | ४.७ | ४.९ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २१ | १७ | १६ | १७ | १६ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस दिवस आकाश अंशतः ढगाळ राहील तसेच पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | १) पावसाळयात फवारणी करीताना स्टीकरचा वापर करावा.<br>२) लम्पी या त्वचा रोग नियंत्रणासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने गोट पॉक्स या लसीचे लसीकरण करून घ्यावे. |
| **संदेश** | | पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| **पशुधन** | | **"लम्पी त्वचा रोग"**<br>**कारणे**<br>या रोगाचा संसर्ग "कॅप्रीपॉक्स" ( Capri pox) विषाणू मुळे होतो. हा विषाणू शेळया व मेंढ्यांमधील देवी रोगाच्या विषाणूशी संबंधित आहे.<br>**पशुपालकांनी घ्यावयाची काळजी**<br>बाधित जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळी ठेवणे.<br>कोणत्याही संभाव्य रोगी जनावरास निरोगी जनावरांच्या कळपात प्रवेशास बंदी करणे.<br>रोग प्रादुर्भाव झालेल्या गावातील बाधित व निरोगी जनावरांना चराऊ कुरणांमध्ये एकत्रित सोडण्यास मनाई करणे.<br>डास, गोचिड व तत्सम किड्यांच्या बंदोबस्त करणे. तसेच , निरोगी जनावरांच्या अंगावर किडे न चावण्यासाठी औषध लावणे व गोठ्यामध्ये यासाठीच्या औषधांची फवारणी करणे.<br>रोग प्रादुर्भाव क्षेत्रातील जनावरांना रोग प्रादुर्भाव नसलेल्या ठिकाणी तसेच स्थानिक बाजारांमध्ये नेण्यास प्रतिबंधक करणे.<br>**प्रतिबंधात्मक उपाय योजना**<br>तत्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करुन घ्यावेत.<br>त्वचेवरील गाठीचे जखमेत रुपांतर झाल्यास जखमेत जंतू पडू नये यासाठी जखमेवर पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनानुसार औषध मलम लावावे.<br>लम्पी या त्वचा रोग नियंत्रणासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने गोट पॉक्स या लसीचे लसीकरण करून घ्यावे. |
| **कापूस** | **फुले उमलणे ते बोंड धरणे** | सततच्या होणाऱ्या पावसामुळे शेतात साचलेले पाणी चर खोदुन काढून टाकावे.<br>तसेच कापूस पिकाचे शेंडे पिवळे पडण्याची शक्यता आहे. वापसा आल्यानंतर पिकास युरिया १५ किलो + म्युरेट ऑफ पोटॅश २५ किलो प्रति हेक्टरी खतांची मात्रा द्यावी.<br>सततच्या पावसाचे शेतात पाणी साचल्यास व जमिनीत वापसा नसल्यास पिकांची मुळे अकार्यक्षम होतात. त्याकरीता उघडीप मिळल्यानंतर खालील फवारण्या कराव्यात.<br>१) १ टक्का मायक्रो ग्रेड II (१०० मिली १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा<br>२) २ टक्के युरिया (२०० ग्रॅम १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा<br>३) १.५ टक्के पोटॅशियम नायट्रेट १३:००:४५ (१५० ग्रॅम १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. |
| **तूर** | **फांद्या फुटण्याची अवस्था** | सततच्या होणाऱ्या पावसामुळे शेतात साचलेले पाणी चर खोदुन काढून टाकावे.<br>सततच्या पावसाचे शेतात पाणी साचल्यास व जमिनीत वापसा नसल्यास पिकांची मुळे अकार्यक्षम होतात. त्याकरीता उघडीप मिळल्यानंतर खालील फवारण्या कराव्यात.<br>१) १ टक्का मायक्रो ग्रेड II (१०० मिली १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा<br>२) २ टक्के युरिया (२०० ग्रॅम १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा<br>३) १.५ टक्के पोटॅशियम नायट्रेट १३:००:४५ (१५० ग्रॅम १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | फवारावे. |
| **कांदा** | | सततच्या होणार्या पावसामुळे कांद्याच्या पाती पिवळया पडत असल्यास उघडीप मिळल्यानंतर टेब्युकोनॅझोल १ मिली + स्टिकर प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **फळ पिके** | | १) आंबा, पेरू, द्राक्ष, मोसंबी व कागदी लिंबू बागेत अतिवृष्टीमुळे पाणी साचले असल्यास त्वरित चर खोदून पाणी बागेबाहेर काढावे. खोडाजवळ पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी , तसेच झाडाच्या खोडास २-३ फूट उंचीपर्यंत बोर्डो पेस्ट (१ कि मोरचूद + १ कि. चुना + १० लि पाणी) लावावे.<br>२) मोसंबी व कागदी लिंबू वरील रस शोषक किडीच्या नियंत्रणासाठी लेकॅनीसिलियम ( Verticillium) या जैविक किडनाशकाची ५० ग्रॅम १० लि पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>३) कागदी लिंबू व मोसंबी फळ झाडावरील कोवळया पानांवर नागअळी किडीचा प्रादुर्भाव दिसताच स्पिनोसॅड ४५ एसी ४.४ मिली अथवा नोव्हँलुरॉन १० ईसी ५ मिली अथवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ३ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात दोन फवारण्या पंधरा दिवसांच्या अंतराने कराव्यात. |
| **पशुधन** | | **पावसाळयात पशुधन व्यवस्थापन**<br>पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>पावसाळयात जनावरांना ओला चारा अति प्रमाणात दिल्यामुळे जनावरांचे पोट फुगते त्यामुळे ओला चारा प्रमाणात द्यावा.<br>पावसाळयात मेंढ्यांच्या खुरामध्ये चिखल्या होतात तेव्हा महिन्यातून एकदा कॉपर सल्फेट किंवा फॉरमॅल्डीहाईड द्रावण असलेल्या उथळ हौदातून संपूर्ण खुर बुडतील अशा सोडाव्यात. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : कृषि महाविद्यालय, धुळे.

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : २३.०९.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**